भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाची ठिकाणे/स्थळांचा विकास करण्यासाठी निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : बैठक-२०१६/प्र.क्र.४७५/बांधकामे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०१८.

<u>संदर्भ</u> : १) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सान्यावि २०१५/ प्र.क्र.१६३/बांधकामे,दि.०९.१०.२०१५
२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.बैठक २०१६/ प्र.क्र.४७५/बांधकामे,दि.२४.०३.२०१७
३) शासन पत्र क्र.बैठक २०१८/प्र.क्र.२४/बांधकामे,दि.०१.०३.२०१८चे पत्र
४) शासन पत्र क्र. बैठक २०१६/प्र.क्र.४८/समन्वय,दि.०८/०३/२०१७ चे पत्र

<u>प्रस्तावना :</u>

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक,राजकीय व आर्थिक क्षेत्रातील योगदान व आधुनिक भारत घडविण्यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या संघर्षाची समाजाला प्रेरणा मिळावी यासाठी दिनांक १४ एप्रिल, २०१५ ते १४ एप्रिल, २०१६ हे वर्ष “समता व सामाजिक न्याय वर्ष” म्हणून साजरे करण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील कार्यक्रमातील भाग-१ मधील अनुक्रमांक ६ अनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या स्थळांचा विकास करणे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाची ठिकाणे/स्थळांचा विकास करणे याचा समावेश करण्यात आला आहे.

२. संदर्भ क्र.१ अन्वये, मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१७ जानेवारी,२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे. तसेच दि.०७ मार्च, २०१८ रोजी मा.मंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त दि.०८/०३/२०१८ रोजी निर्गमीत करण्यात आले आहे. सदर इतिवृत्तामधील मान्यतेनुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाच्या असलेल्या एकूण ११ ठिकाणांची यादी अंतिम करण्यात आली आहे. सदर ठिकाणांच्या विकासासाठी विविध स्वयंसेवी संस्थांकडून/नगर परिषद/ नगरपालिका/ग्रामपंचायत इ.कडून प्राप्त होणाऱ्या कामांना आवश्यक असलेला निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाची असलेली ठिकाणे/स्थळांचा विकास करण्यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात मागणी क्रमांक एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९, अनुसूचित जाती घटक योजना, ०२-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (योजनांतर्गत-दत्तमत) लेखाशिर्ष (२२२५ डी ८२३ या लेखाशिर्षाखाली रु.१३६.०० कोटी (रु.एकशे छत्तीस कोटी फक्त) निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. यातील रु.२०.४० कोटी इतका निधी (परिशिष्ठ-अ नुसार) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाची असलेली ठिकाणे/स्थळांचा विकास करण्यासाठी आवश्यक आहे.

२. उपरोक्त सन २०१७-१८या आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्पीत रु.१३६.०० कोटी नियतव्यय नियंत्रक अधिकारी, आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या अधिनस्त आहे. संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये गठीत समितीच्या दि.१ जानेवारी, २०१८ व दि.०७ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकींत देण्यात आलेल्या मान्यतेनुसार, सोबतच्या परिशिष्ठ- अ मध्ये दर्शविल्यानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्वाची असलेली ठिकाणे/ स्थळांचा विकास करण्यासाठी उपलब्ध तरतुदीपैकी नियंत्रक अधिकारी, आयुक्त, समाजकल्याण, पुणे या कार्यालयास वितरीत करण्यात आलेल्या तरतुदीतून रु.२०.४० कोटी (रुपये वीस कोटी चाळीस लक्ष फक्त) तरतुद आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी आहंरित करुन सदरहू तरतुद ठेव अंशदान स्वरुपात समन्वयक तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. यानुसार आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांनी कार्यवाही करावी.

३. संदर्भ क्र.३ व ४ अन्वये अंतिम करण्यात आलेल्या ११ स्थळे/ठिकाणे याबाबतचे सवितस्तर प्रस्ताव हे निकष व मार्गदर्शक तत्वानुसार विहीत मार्गाने आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करण्यात यावेत. या अंतर्गत निवड केलेल्या व मान्यता दिलेल्या ठिकाण/स्थळांच्या प्रस्तावास स्वतंत्रपणे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. उपरोक्तपणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त ठेवण्यात आलेल्या निधीतून, करण्यात आलेल्या कामांच्या प्रगतीचा व खर्चाचा अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी वेळोवेळी शासनास सादर करावा.

४. यावरील खर्च हा मागणी क्रमांक एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९, अनुसूचित जाती घटक योजना, ०२-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (योजनांतर्गत-दत्तमत) लेखाशिर्ष (२२२५ डी ८२३) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकण्यात यावा. यासाठी आयुक्त,समाजकलयाण, पुणे यांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त करावयाच्या कार्यक्रमाकरीता मा.मंत्री,सा माजिक न्याय व विशेष सहाय्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीस संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या अधिकारानुसार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक १ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसुरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०३१४१८३९५६३७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.14 18:42:40 +05'30'

(अ.कों.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२) आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,पुणे
३) मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे
४) महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र,पुणे
५) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
६) सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग
७) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९) कार्यकारी अभियंता तथा समन्वयक,सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे
१०) मा.मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव
११) मा.राज्यमंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव
१२) सर्व संबंधित स्वयंसेवी संस्था/नगरपालिका/नगरपरिषद व यंत्रणा यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
१३) निवडनस्ती/बांधकामे.

परिशिष्ट अ

अ. क्र.	ऐतिहासिक स्थळांची नावे	कामाचे स्वरुप	अंदाजित रक्कम (कोटीमध्ये)
१	कापडगाव ता.जि.रत्नागिरी	बौध्दविहार व परिसर विकास	१.०२
२	नागभूमी,कामठी रोड,नागपूर	बांधकामे व परिसर विकास	१.००
३	डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दिवेटप्पा,बोलिचिंतन,ता.श्रीवर्धन, जि.रायगड	बांधकामे व परिसर विकास	१.००
४	त्रैलोक्य बौध्दजन महासंघ सहाय्यक गण,दापोडी,पुणे	बांधकामे व परिसर विकास	०.५०
५	भिडे वाडा,पुणे	बांधकामे व परिसर विकास	०.५०
६	एलफिन्स्टन हायस्कूल,मुंबई	बांधकामे व परिसर विकास	०.५०
७	आंबेटेंबे,मुरबाड,जि.ठाणे	भिमाई स्मारकाचे बांधकाम करणे	४.९८
८	मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतीगृह,नाशिक या इमारतीचे बांधकाम	मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम	४.९८
९	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठ, नागपूर	संविधान प्रस्ताविका पार्कची उभारणी करणे	२.५३
१०	हरिजन सेवा संघ,पुणे संचलित राजेंद्र वसतीगृह परिसरात डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधणे	स्मारक,लायब्ररी इत्यादी	३.१४
११	संवाद बौध्दवाडी, ता.पोलादपूर, जि.रायगड, बौध्द विहाराची पुनर्बांधणी करणे	बौध्दविहाराची पुनर्बांधणी	०.२५